# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (जनसंपर्क विभाग)

**प्रसिद्धी पत्रक** **ता. १४ एप्रिल २०२०**

# सतरंजीपूरा झोन अंतर्गत दलालपूरा परिसर सील

## मनपा आयुक्त तुकाराम मुंढे यांचे आदेश : सुरक्षेच्या दृष्टीने निर्णय

**नागपूर, ता. १४:** नागपूर महानगरपालिका हद्दीतील सतरंजीपुरा झोन अंतर्गत दलालपूरा प्रभाग क्रमांक २१ येथे कोरोनाबाधित रुग्ण आढल्याने व त्याचा प्रादुर्भाव शहरातील इतर भागात होउ नये म्हणून नागरिकांची सुरक्षा लक्षात घेता हा संपूर्ण परिसर सील करण्याचे आदेश मनपा आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिले आहेत.

या आदेशानुसार सतरंजीपुरा झोन क्रमांक ७ अंतर्गत असलेल्या प्रभाग क्रमांक २१ च्या दक्षिण-पश्चीमेस मस्कासाथ चौक, उत्तर-पश्चीमेस चकना चौक, उत्तर-पूर्वेस महाजन किराणा, पूर्वेस शिवशक्ती इनक्लेव, दक्षिण-पूर्वेस दहीबाजार पूल, दक्षिणेस रोकडे बिल्डींग प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले आहेत. या भागात येणारे व जाणारे सर्व मार्ग तात्काळ बंद करून या भागाच्या सीमा आवागमनासाठी पुढील

आदेशापर्यंत बंद करण्यात येत असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

शासकीय व निमशासकीय सेवेतील अत्यावश्यक सेवेत कार्यरत असणारे अधिकारी व कर्मचारी, आवश्यक तातडीची वैद्यकीय कारणे तसेच अंत्यविधी, वैद्यकीय सेवेशी संबंधित खाजगी डॉक्टर, परिचारीका, मेडीकल स्टोअर्स दुकानदार, पॅथॉलॉजिस्ट, रुग्णवाहिका, पोलिस विभागामार्फत पासधारक असलेले जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करणारे व्यक्ती यांना या आदेशातून वगळण्यात आले आहे.